अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,

आस्थापना विभाग, पुणे मनपा.

जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/५२७७

दिनांक :- २६/१०/२०२०

-: आदेश :-

विषय :- **कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.**
कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत विविध विभागाकडे उपलब्ध करून दिलेल्या शिक्षण विभाग (प्राथमिक) कडील उप शिक्षकांना रोटेशन नुसार उपलब्ध करून देणेबाबत

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) कार्यालयीन आदेश जा.क्र.अति.मआ/साप्रवी/आस्था/३७६९ दि.३१/०८/२०२० चे परिमंडळ क्र १ ते ५, क्षेत्रीय कार्यालय निहाय व , आपत्ती व्यवस्थापन विभाग **रोटेशन आदेश**

पुणे महानगरपालिका हद्दीत सध्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत आहे.त्याचा प्रसार होऊ नये यासाठी पुणे महानगरपालिका वेगवेगळया स्तरावर कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत.

कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत संदर्भ क्र ४ अन्वये परिमंडळ क्र १ ते ५, क्षेत्रीय कार्यालय निहाय, आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे रोटेशन नुसार प्राथमिक शिक्षण कडील शिक्षकांचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत,

**आता संदर्भ क्र ४ अन्वये नेमणूक केलेल्या व प्रत्यक्ष कामावर हजर झालेल्या सर्व शिक्षकांना या आदेशान्वये कार्यमुक्त करावे, सदर शिक्षकांना कार्यमुक्त करताना ज्या शिक्षकांनी प्रत्यक्ष ३० दिवस काम केलेले आहे अशाच शिक्षकांना संबंधित विभागाने कार्यमुक्त करावे.** कार्यमुक्त झालेल्या शिक्षकांनी शैक्षणिक कामासाठी त्वरीत शाळेत रुजू व्हावे व रुजू झालेबाबतचा अहवाल प्रशासकीय अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग यांना सादर करावा.

परंतू सदर कार्यमुक्त केलेल्या शिक्षकांना ऐवजी रोटेशन नुसार शिक्षण विभाग (प्राथमिक)कडील सोबत जोडलेल्या यादीनुसार उपशिक्षकांना विविध कार्यालयाकडे उपलब्ध करून देण्यात येत आहे. सबंधित कर्मचारी यांनी नेमून दिलेल्या विभागातील अधिकारी यांचे नियंत्रणाखाली त्यांचे आदेशानुसार कामकाज करावयाचे आहे.

सदर कर्मचारी नेमून दिलेल्या ठिकाणी हजर न झाल्यास व सदरच्या कालावधीत या कामास नकार देणाऱ्या,हलगर्जीपणा करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध संदर्भीय कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सबंधित अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त कोरोना विषाणू आजाराच्या कामकाजाबाबत सदर कर्मचाऱ्यांचे आदेश आपले स्तरावरून प्रसृत करावेत.

वरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती या कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत आहेत. तसेच सदरचे सेवकांचे रुजू अहवाल सबंधित क्षेत्रीय कार्यालयाने उप आयुक्त (सामान्य प्रशासन)यांचेकडे सादर करावेत.

Rubal

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत -
मा.महापालिका आयुक्त,
मा.अतिरिक्त आयुक्त (वि/इ) यांना माहितीस्तव.

प्रती – १) सर्व संबंधित खातेप्रमुख
२) प्रशासकीय अधिकारी,प्राथमिक शिक्षण विभाग ,पुणे महानगरपालिका